

ISSN 2250-1215
वनराई
विशेषांक
शाश्वत
देवराई

# जैवविविधता आणि श्रध्देचा अद्भुत संगम





**डॉ. अमृता जोगळेकर**
संचालक

**डॉ. मेधावी राजवाडे**
सह-संस्थापक

**इकोव्रत एनवायरोसोल्युशन**

> अगदी अलीकडच्या शतकापर्यंत देवराया एकमेकांशी कुठल्यातरी जंगलपट्ट्याने जोडलेल्या होत्या. परिसरात देवघेव चालू होती. आता त्या एकट्या पडल्या आहेत. या एकट्या पडलेल्या देवराया अजूनही अनेक दुर्मीळ वनस्पतींना, प्राण्यांना आधार देत आहेत...



शेत आणि मोकळ्या रानाच्या मधोमध असलेली देवराहाटी

देवराई... अनेक पिढ्या जपलेली परंपरा. श्रद्धेचे अधिष्ठान, कौलारू देऊळ किंवा झाडाच्या सावलीत उभ्या असलेल्या मूर्ती. गूढता. सावली देणारे जंगल, खळखळ वाहणारा झरा, झाडाच्या ढोलीतून हळूच डोकावणारा एखादा पक्षी किंवा विश्रांती घेणारा चापड्या साप, हिरव्यागार मॉसने वेढलेली खोडे आणि उंचउंच गेलेल्या पिळदार वेलीवर झोका घेणारी लहान मुले. देवराईची पहिली ओळख झाली तेव्हा असेच चित्र होते.

संपूर्ण भारतात अगदी घनदाट जंगलापासून वाळवंटापर्यंत दिसून येणारी परंपरा म्हणजे देवराई. देवाकरता राखलेले वन, जंगल. सोप्या भाषेत देवराई म्हणजे कोणत्याही प्रकारचा भूभाग जिथे विरळ ते घनदाट झाडी असेल. सर्व भौगोलिक आणि प्रादेशिक प्रांतात वेगवेगळ्या नावांनी हा भूभाग राखला गेला आहे. जंगल अभ्यासाचा आमचा औपचारिक प्रवासच देवराईवरील चर्चासत्राचे मुद्दे काढणे या कामातून सुरू झाला. त्यामुळे सुरुवातीलाच देवराई आणि त्याचे निसर्गातील महत्त्व याची अनेक तज्ज्ञांकडून माहिती मिळाली. देवराईबद्दल उत्सुकता, ओढ निर्माण झाली आणि देवराईमध्ये जाऊन अभ्यास करायचे ठरले.

### देवराई आणि जैवविविधता

जैवविविधतेचे भांडार असणाऱ्या देवरायांमध्ये पहिला अभ्यास मोठ्या झाडांच्या वाढीवर केला. वेगवेगळ्या उंचीच्या आणि घेराच्या मोठ्या झाडांची किती लहान रोपे देवरायांमध्ये वाढतात? त्याच्या तुलनेने देवराई नजीकच्या परिसरात झाडांची रोपे किती प्रमाणात आणि कशी आढळतात? कोणत्या झाडांच्या जातींची रोपे सापडतात? तसेच देवरायांमध्ये किती घेराचे वृक्ष आहेत आणि आसपासच्या परिसरात त्याच वृक्षजाती किती घेराच्या आहेत? हा अभ्यास गेल्या १७ वर्षांमध्ये सह्याद्रीतील विविध जंगल भागात पार पाडला. घनदाट निमसदाहरित देवराईमध्ये जेव्हा पहिल्यांदा अभ्यास केला तेव्हा रोपांचा सगळ्यांत छोटा वर्ग (उंची ४० सें.मी. पर्यंत) हा मोठ्या प्रमाणात आढळला. परंतु जशी रोपांची उंची वाढत गेली तशी ही संख्या कमी होत गेली. देवराईबाहेरील आसपासच्या भागात तर एकूणच लहान रोपांची संख्या कमी आढळली तर सर्वांत छोटी ४० सें.मी.पेक्षा कमी उंचीची रोपे नगण्य होती. जंगल वाढण्यासाठी आणि टिकण्यासाठी वेगवेगळ्या उंचीची लहान रोपे योग्य संख्येने असणे गरजेचे असते. देवराईमध्ये लहान रोपांचे हे प्रमाण आसपासच्या परिसरापेक्षा बऱ्यापैकी सुस्थितीत होते; परंतु देवराईबाहेर हे प्रमाण सुस्थितीत


*कोकमाची देवराई*

नसण्यामागील अनेक कारणांपैकी काही कारणे अशी की देवराई बाहेरील जंगलात मोठी झाडे कमी होती तसेच छोट्या रोपांना लागणारी रुजवण परिस्थितीदेखील नव्हती. तुलनेने घनदाट असलेल्या देवराईमध्ये एखादे मोठे जांभूळ किंवा आजन *(Memecylon umbellatum)* पडल्यामुळे झालेल्या जागेवर बऱ्याच वेळा मोकळ्या जंगलातील (Open forest) झाडे जसे की चांदडा, गेळा, लिगस्ट्रम *(Ligustrum)* यांची रोपे सापडली. हेसुद्धा निसर्ग नियमानुसार अपेक्षित होते. पण हीच रोपे देवराईबाहेर जिथे खरे मोकळे जंगल आहे तिथे मात्र अगदीच कमी होती. देवराईतील जंगल चांगले ६०-८० फूट उंचीचे होते तर आसपासचे जंगल बुटके होते. एकूणच रोपवाढीला आवश्यक चांगले वातावरण अजूनही देवराईमध्ये टिकून आहे.

कधीकधी एखादी देवराई प्रामुख्याने काही विशिष्ट प्रजातीच्या झाडांची असते. अशा कोकम, सीता अशोक झाडांच्या देवराया आम्ही बघितल्या आहेत. वनौषधी झाडांचा अभ्यास करताना आम्ही कोल्हापूरजवळील एका सीता अशोक देवराईजवळ पोहोचलो. सीता अशोकचा नैसर्गिक आढळ हा पाण्याच्या प्रवाहांच्या कडेनी मोठ्या प्रमाणावर दिसतो. आम्ही बघितलेल्या देवराईतदेखील अशीच झाडे होती. प्रवाहांकडेच्या आसपासच्या भागांत ही झाडे आढळली नाहीत. अगदी देवराईमधून बाहेर पडणाऱ्या प्रवाहांच्या कडेनी ही झाडे कमी होत जात आहेत असे दिसून आले. ही देवराई सीता अशोक वाढीला अत्यंत सूक्ष्म वातावरण देत होती. आम्ही अभ्यास केल्यानंतर पुढे दोनच वर्षांत या देवराईत वृक्षतोड झाली आणि मोठ्या प्रमाणात बदल झाले. वेल्हे परिसरातील मालकी जमिनींवर कोकम वृक्षाच्या देवराया दिसून येतात. वेल्हे परिसरात मोठ्या घेरांची झाडे आता फक्त देवरायांमध्येच शिल्लक आहेत कारण आसपासचा परिसर हा जेसीबीने, पोकलेनने पूर्ण पोखरून टाकला जात आहे. अशीच परिस्थिती पूर्ण सह्याद्रीमधील बऱ्याच देवरायांच्या बाबतीत आहे. देवराईच्या झाडोऱ्याचा अभ्यास करताना अजून एक महत्त्वपूर्ण बाब आमच्या लक्षात आली ती म्हणजे बहुतांश देवराया या आंतरराष्ट्रीय स्तरावर दुर्मीळ मानल्या जाणाऱ्या झाडांचे आश्रयस्थान आहेत. सीता अशोक, कडू कवठ, हडक्या अशा वेगवेगळ्या मोठ्या झाडांचा समावेश यात होतो. कोकणातील मालकी जमिनीवर असणाऱ्या अनेक देवरायांमध्ये कडू कवठाचे मोठे वृक्ष आहेत आणि सुदैवाने बऱ्याच झाडांची प्रजनन चक्रे अजून चालू आहेत. काही स्थानिक दुर्मीळ झाडे उदाहरणार्थ, जासुंद *(Antiaris toxicaria)*, येरींडी


*झाडाच्या ढोलीतून झऱ्याचा उगम*

*(Dysoxylum binectariferum)* या वृक्षांच्या सान्निध्यात वाढत आहेत. देवरायांमध्ये भौगोलिक स्थानांनुसार झाडांच्या प्रजातींचे पुंजके/गट एकमेकांबरोबर वाढताना आढळून येतात.

या झाडांच्या बरोबर तिथले पक्षी-प्राणी पण विशिष्ट असतात. मोठ्या आकारांची घुबडे आम्ही बऱ्याच वेळा देवराईमधील झाडांवर विश्रांती घेताना बघितली आहेत. भूभागाचा बदलता वापर बघता भविष्यात भीमाशंकरच्या आसपासच्या भागात शेकरूला अभयारण्या बाहेर फक्त देवराईमध्येच आसरा राहणार आहे. बऱ्याच ठिकाणी झालेल्या अमाप जंगलतोडीमुळे देवराईच्या कडेनी काही जंगल राहिलेच नाही. सरकारी सुरक्षित जंगलाबरोबर मोठे प्राणी देवरायांमध्ये आसरा घेतात हे आमच्या अभ्यासात समोर आले. कोकणातील एका देवराई अभ्यासात असे लक्षात आले की तिथल्या मोठ्या झाडांना छान फळे आली होती. त्यातील बहुतांश झाडे ही बिया वाहून नेण्याकरता धनेशसारख्या मोठ्या पक्ष्यांवर अवलंबून होती. जंगल वाढीकरता आवश्यक असणारे बियाणे विकीरण (seed dispersal) प्रक्रिया (बिया इकडून तिकडे नेणे) महत्त्वाची बाब आहे. या देवराईमध्ये पक्षीपण होते आणि फळे आलेली झाडेही होती; परंतु आसपासचा परिसर पूर्णपणे प्रतिकूल असल्याने त्या बिया नुसत्याच देवराईच्या बाहेर पडल्या होत्या त्यातून रोपे आलेली नव्हती. देवराईचे जंगल टिकण्यासाठी आणि ते जिवंत राहण्यासाठी तिचे आसपासच्या परिसरावरील अवलंबित्वदेखील अभ्यासणे गरजेचे आहे.

सह्याद्रीपासून थोडे दूर कमी पावसाच्या प्रदेशात झाडांची काही स्थाने आम्ही बघितली आहेत. ज्याला तिकडचे स्थानिक लोक देवराई म्हणत नसले तरी तिथे वावरताना काही नियम असतात, जसे की तिथल्या झाडाला हात लावायचा नाही. तिथे तोड करायची नाही. बऱ्याच वेळा अशा ठिकाणी अत्यंत जुना असा मोठ्या घेराचा बाभूळ वृक्ष किंवा वड/नीम झाड असते आणि आसपास लांबच लांब पसरलेला गवताळ परिसर किंवा अत्यंत खुरटे वन. अशा ठिकाणी ही स्थाने सावल्या देणाऱ्या देवरायांसारखीच भासतात.

जैवविविधतेबरोबर अनेक नद्या, झरे यांचा उगम देवरायांमधून होतो. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक मोठ्या नद्या या देवरायांमधून उगम पावल्या आहेत. अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितींमुळे संपूर्ण देवराया या श्रद्धेची स्थाने आहेत.

### देवराई आणि स्थानिक परंपरा

अनेक देवराया या गावाच्या क्षेत्रपालाच्या किंवा क्षेत्रदेवतेच्या नावाने राखलेल्या असतात. बऱ्याच वेळा या देवता गावावर येणाऱ्या संकटांपासून गावाचे रक्षण करतात अशी श्रद्धा असते. या देवराया आणि देवाचे स्थान बहुतांश ठिकाणी मुख्य वस्तीपासून लांब, वेशीवर असते. देवराई, तिथले उत्सव आणि त्यामध्ये निसर्गआधारित काय काय कार्य होतात यावर आम्ही अभ्यास केला. एका देवराईमधील देवीसमोर गावातील माती आणि पाणी वापरून शेतीतील काही बियाणे पेरले होते. गावातील जाणकार माणूस दहाव्या दिवशी त्यातून किती बियाणे उगवले यावरून या वर्षी गावात शेतीमध्ये कसे पीक येईल याचे भाकीत सांगणार होता. आम्ही तो सगळा सोहळा बघितला. तिथे असलेल्या लोकांशी बोलून असे लक्षात आले की जवळपास ८०-९० टक्के हे भाकीत खरे ठरते. जेव्हा काही मॉडेल्स, विद्यापीठे, विज्ञान केंद्रे अस्तित्वात नव्हती तेव्हा असे भाकीत लोकांच्या नक्कीच उपयोगाचे ठरले असेल.

अनेक देवरायांमध्ये देवळे नव्हती. देवावर छप्परपण नव्हते. काही ठिकाणी लोकांनी प्रयत्न केले; परंतु ते काम पूर्ण होऊ शकले नाही. तिथल्या लोकांनी आम्हाला सांगितले देवाचीच इच्छा नाही म्हणून छप्पर उभे करताना काहीतरी मोठी आपत्ती येते. याची शहानिशा आम्ही केली नाही; पण असे जुने देऊळ, एका चौथऱ्यावर बसलेले देव बघून आम्हाला तरी खूप छान वाटायचे. काही ठिकाणी मात्र हे देऊळ बांधताना देवराईच तोडलेली आम्ही बघितली आहे. पुण्याजवळील एका देवराईमध्ये तर देवळाच्या कडेनी खूप जाड प्लास्टिक अंथरले होते. असे का केले तर तिथे झाडे वाढू नयेत म्हणून. झाडे वाढली की देवळाच्या बांधकामाला धक्का पोहोचतो. अशा वेळी मात्र एक क्षण प्रचंड वाईट वाटले. श्रद्धेने बांधून ठेवलेल्या या परंपरेला नावीन्याची चाहूल लागली आहेच; पण यात जे जंगल आहे त्यावर मोठा आघात होत आहे.

### राखलेले होतेच पण आता वाचवायला लागणार आहे!

देवराई हा श्रद्धेचा आणि निसर्ग रक्षणाचा अनौपचारिक मार्ग यांचा उत्तम संगम आहे. देवरायांनी झाडांच्या, प्राण्यांच्या अनेक पिढ्या वाढविल्या आहेत. पण हे वाढवताना आसपासच्या परिसराचा, त्यापासून दूर असणाऱ्या अशाच प्रकारच्या जंगलांचादेखील खूप मोठा वाटा आहे. अगदी अलीकडच्या शतकापर्यंत या देवराया एकमेकांशी कुठल्यातरी जंगलपट्ट्याने जोडलेल्या होत्या. परिसरात देवघेव चालू होती. आता त्या एकट्या पडल्या आहेत. या एकट्या पडलेल्या देवराया अजूनही अनेक दुर्मीळ वनस्पतींना,



देवराईमधील पुरातन फणस वृक्ष

प्राण्यांना आधार देत आहेत. एखाद्या वयोवृद्ध आजीप्रमाणे ही देवराई दुष्काळात फणस, रुखाळू आजदेखील देते. तिच्या कुटुंबाला तिच्यापासून तोडले असले तरी... पण अजूनही वेळ गेली नाही. देवराई वाचवण्याचे अनेक चांगले प्रयत्नदेखील चालू आहेत. यामध्ये काही ठिकाणी देवरायांच्याकडेने तिथल्या जमिनीला अनुसरून वृक्ष लागवड करत आहेत. कुणी परत देवराईचे नियम नव्याने लिहीत आहेत. पण हे अगदीच त्रोटक प्रयत्न आहेत. शास्त्रीयदृष्ट्या हे एखाद्या वेळेस होईल पण श्रद्धेचे काय?

जशी जंगल वाचविण्याकरता फक्त श्रद्धा पुरे पडणार नाही तसेच नुसते शास्त्रीय संशोधनपण पुरे पडत नाही असे दिसून आलेले आहे. कांतारा सिनेमा आठवला. जंगल वाचवायला नुसती सरकारी मदत पुरे नाही पडणार तर प्रत्येक माणसाचा यात सहभाग हवा आणि श्रद्धा हवी. तरच तिथे निसर्गरूपी देवतेची स्थापना होईल.

@ : amruta@ecovratenvirosolutions.in